**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६२/२०२५ मधील नि.१ वरील आदेश</u>**
**प्रकाश व इतर विरुध्द निरंक**
**[CNR NO. MHBIO800-0106-2025]**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

अर्जदाराच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे.—

२. मयत सोपान पि.पांडुरंग गवळी यांचा मृत्यू **दि.११.०९.२०१५** रोजी गंगामसला ता.माजलगाव जि.बीड येथे झालेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदारांस शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदारांतर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली.

४. अर्जातील बाबींना व अर्जदारांच्या युक्तीवादास अनुसरुन खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| | मुद्दे | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

**<u>कारणमिमांसा</u>**

<u>मुद्दा क्र १ बाबत</u>

५. अर्जदार यांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदार क्र. ३ रमेश पि.सोपान गवळे याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१०, मयताचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्रं.६ तसेच वर्तमानपत्रामधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क्र.९ अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. पटलावर दाखल एकंदर पुरावा पाहता तो

अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय असल्याचे दिसुन येते.

६. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी **दि.२५ जानेवारी २०२५** रोजी दै.माजलगाव टाईम्स (नि.क्र.९) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. परंतु आजपर्यत कोणीही आक्षेप नोंदविला नाही.

७. अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये, मयतांस अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस आहे हे सिध्द होते. त्यामुळे मी मुद्दा क्र १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुण, मुद्दा क्र २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ प्रकाश पि.सोपान गवळी, अर्जदार क्र.२ अशोक पि.सोपान गवळी व अर्जदार क्र.३ रमेश पि.सोपान गवळी हे मयत **सोपान पि.पांडुरंग गवळी** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस—प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

३) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क स्विकारुन अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.02.25 17:48:32 +0530

**दिनांक : २५/०२/२०२५.** **( एम.ए.कुलकर्णी )**
ठिकाण : माजलगाव. ४थे सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर, माजलगाव.